23/08/2024, 13:45 16679740149631967587463144779875 - Sunanda Julme.jpg

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 334 (CCCXXXIV)
ISSN : 2278-9308
January, 2022

# अनुराधा पाटील यांच्या कवितेचे वाड्.मयीन वैशिष्ट्य

डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे
१५२, नाईक नगर, पोस्ट- पार्वती नगर, मानेवाडा रिंग रोड,नागपूर , ४४००२७
मोबा. ८७६६४२२४७५, ई-मेल sunandaj@gmail.com

**गोषवारा -**

मराठी वाड्.मयात कवितेने पूर्वीपासूनच आपला लौकिक सिद्ध केला आहे. कविता रूपकांच्या, प्रतिमांच्या माध्यमातून बोलत असते. कवितेतील रूपके अन्य रूपकांशी, प्रतिमा अन्य प्रतिमांशी संबद्ध होऊन आशयाचे विविध आकार सिद्ध करतात. त्यामुळे कवितेची भाषा गद्याच्या तर्कनिष्ठ भाषेपेक्षा वेगळी असते. ती प्रत्येक वेळी नवा अर्थ व नित्य नूतन अनुभव प्रकट करीत असते. लय, नादरम्यता, शब्दांचा समतोल, रसानुभूती, भावोत्कटता केवळ कवितेतच शक्य असते. कवितेत असणारे नादसौंदर्य व अर्थव्यापकता गद्यात अशक्य आहे. कवितेच्या भाववृत्तीशी वाचकमनाची तादात्म्यता साधली की प्रत्येक शब्द बोलका होतो. कवितेची अनेकार्थक्षमता भिन्नकाळी, भिन्न रसिकांशी हृदयसंवाद साधू शकते. टर्नर नावाचे भाषेचे अभ्यासक म्हणतात, "poetry, because it aims to be universal, will be most ambiguous of all." अर्थ सूचकता, श्लेष, विरोधाभास, शब्दांचे विचलन, अनुनादात्मक शब्द, अर्थवाही रचनाबंध अशा प्रयुक्त्यांनी कवितेला सौंदर्य प्राप्त होते. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील अशा काही वाड्.मयीन वैशिष्ट्यांचा विचार या लेखात केला आहे.

**बीज शब्द -** वाड्.मय, कविता, संवेदना, स्त्रीत्वाचा शोध, आशयसूत्र, अनुभवविश्व इत्यादी

**प्रस्तावना -**

अनुराधा पाटील यांच्या कवितेत आत्मनिष्ठ भावभावनांचा उत्कट आणि तरल आविष्कार आहे. सहजता आणि अकृत्रिमता यामुळे ही कविता लक्ष वेधून घेते. आत्मपरता, निसर्गाची ओढ, अज्ञाताचे आकर्षण, जीवनातल्या अटळतेमुळे आलेली उदासी आणि व्याकुळता, प्रेमभावनेचे चित्रण हे रोमँटिक कवितेचे काही विशेष अनुराधा पाटील यांच्या कवितेत आढळतात. अनुराधा पाटील यांचे जीवनाकलन दुःखात्म असल्याने त्यांची कविता दुःख भान वारंवार व्यक्त करते. दुःख भावनांशी निगडित व्यथा, वेदना, विरह, उदासी एकाकीपणाचे भाव त्यांच्या कवितेत कमी-अधिक प्रमाणात व्यक्त होत राहतात. ही कविता एका स्त्रीची स्त्रीत्वाच्या शोधाची कविता आहे. अशा या वैशिष्ट्यपूर्ण कवितेतील आविष्कारनिष्ठ वैशिष्ट्यांचा विचार येथे करायचा आहे. या कवितेत प्रामुख्याने मुक्त शैलीचा वापर असला तरी कवितेकडे ओढून नेणारी एक आंतरिक लय स्वाभाविकपणे साधली गेली आहे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत लेखाचा अभ्यास दुय्यम सामग्री वरून करण्यात आला आहे. त्यात वर्तमानपत्र व इंटरनेटचा समावेश आहे.

संशोधनाचा उद्देश -

१) अनुराधा पाटील यांच्या कवितेचा अभ्यास करणे.

२) अनुराधा पाटील यांच्या कवितेतील वाड्.मय वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

गृहितकृत्य - अनुराधा पाटील यांची कविता वाड्.मयीन वैशिष्ट्यांनी सौंदर्यपूर्ण झाली आहे.



https://drive.google.com/file/d/1yCfePwY09lgiRdYvrGP8j7Xktcw05o_F/view 1/1